# परळीत राख माफियांना दणका; वाल्मिक कराडच्या साम्राज्याची झाली 'राख'!



अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २०३ ■ शुक्रवार दि.११ एप्रिल २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 203 ■ Friday Dt.11 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# औष्णिक विद्युत केंद्र आणि पोलिसांच्या दुर्लक्षामुळेच कराडसारखे हैवाण गब्बर झाले?

## निविदा प्रक्रियेतूनच राख उपसा; परळी औष्णिक केंद्रातून बाह्य लोकांनी लंपास केली राख? महिनाभरात ३६ कोटी तर वर्षभरात ४५० कोटींची राखेतून होत होती कमाई?

### तब्बल ५२ वर्षांपासून राख माफियांकडून होती वाहतूक; अनेक वर्षांपासून राखेचं अधिकृत कंत्राट नाही?

### एक ट्रक राखेला आठरा ते वीस हजारांचा होता भाव; दररोज एक ते सव्वा कोटींच्या राखेची विक्री?

### १६ निविदाधारक कंपन्यांच्या माध्यमातून पोलीस बंदोबस्तात राखेच्या वाहतूकीची परवानगी

### परळीत राख माफियांना लगाम घालण्याच्या निर्णयाचे स्वागत करतानाच आ. सुरेश धसांचे पोलिसांकडे बोट?

### वाल्मिक कराडने राखेतून काळ्या कारनाम्यांचं साम्राज्य उभं केलं?

### मात्र आता पोलीसांनी घेतलेली भूमिका कायम राहणार की, पुन्हा नव्या हैवानांच्या काळ्या कारनाम्यांमुळे बीडची राख होणार?



बीड । प्रतिनिधी

सध्या चर्चेत असलेले बीडमध्ये वाल्मीक कराडच्या मक्तेदारीतील परळी औष्णिक केंद्रात अखेर बाह्य एजन्सींना राख उपसण्याची संधी मिळाली आहे. २ एप्रिल रोजी महानिर्मितीने राख उपशण्यासाठी नव्या निविदा प्रक्रियेची अंमलबजावणी केली. या प्रक्रियेनंतर १८ पात्र एजन्सींना राख उपशाची अधिकृत मंजुरी देण्यात आली आहे. परळी औष्णिक केंद्राच्या दाऊदपूर तलावातील राख आता अधिकृत दर भरून उचलता येणार आहे. या निर्णयामुळे परळीतील राख माफियांवर आळा बसणार असल्याचे संकेत मिळाले आहेत.

गँग्ज ऑफ वासेपूरच्या धनबादमध्ये कोळशातून गुन्हेगारी जन्माला आली. तर त्याच कोळशाच्या राखेतून वाल्मिक कराडची गँग्ज ऑफ परळी जन्माला आली. माफियांचं काळं साम्राज्य उभं राहिलं. मात्र आता परळीच्या औष्णिक विद्यूत केंद्राने वाल्मिक कराडच्या सत्तेला सुरुंग लावलाय. निविदा असलेल्याच कंपन्यांना आता परळीच्या दाऊतपूर तलावातून राख उपसण्याची परवानगी देण्यात आलीय. राख, राखेतून पैसा, पैशातून सत्ता मिळवत कराडने खंडणी, खून, मारामाऱ्या करुन काळं साम्राज्य उभं केलं. मात्र आता १६ निविदाधारक कंपन्यांच्या माध्यमातून पोलीस बंदोबस्तात राखेच्या वाहतूकीची परवानगी मान्यता दिलीय.

परळीत राख माफियांना लगाम घालण्याच्या निर्णयाचं स्वागत करतानाच आमदार सुरेश धसांनी पोलिसांकडे बोट दाखवलंय. राखेतून फिनिक्स पक्ष भरारी घेतो. मात्र बीडमध्ये वाल्मिक कराडने राखेतून काळ्या कारनाम्यांचं साम्राज्य उभं केलं. मात्र औष्णिक विद्यूत केंद्र आणि पोलीसांच्या दुर्लक्षामुळेच कराडसारखे हैवान गब्बर झाले. मात्र आता पोलीसांनी घेतलेली भूमिका कायम राहणार की पुन्हा नव्या हैवानांच्या काळ्या कारनाम्यांमुळे बीडची राख होणार का? हेच पाहायचं आहे.

गेल्या काही वर्षांपासून काही व्यक्ती महाजनकोला रॉयल्टी न देता बेकायदेशीरपणे राख उपसा करत होते. दररोज जवळपास शंभर ट्रक भरून राख बाहेर घेऊन जात होती, ज्यामुळे महाजनकोच्या गंभीर परिणाम होत असल्याचे समोर आले होते. सर्व सुरु असताना मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राख व्यवहारातील आर्थिक घोटाळ्याचा पर्दाफाश झाला. यानंतर, १ जानेवारी २०२५ पासून महाजनको बेकायदेशीर राख उपसा पूर्णतः बंद केला होता. सध्या मात्र, पोलिसांच्या बंदोबस्तामे अधिकृतपणे राख उपसा सुरू करण्यात आला आहे.



# बंजारा समाजाच्या वतीने वडवणी शहर कडकडीत बंद



वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील दि.०८ रोजी वसंतराव नाईक चौकाचे सुशोभीकरण करत असताना बेकायदेशीर चौकातील मोरया हॉस्पिटलचा फलक लावण्यात आला होते. परंतु वसंतराव नाईक चौकाचे सुशोभीकरण करण्यासाठी मोरया हॉस्पिटलचा बोर्ड काढण्यात आला. बोर्ड का काढला, या कारणावरून दोन गटांमध्ये मारहाण व शिवीगाळ करण्यात आली.

यात बंजारा समाजातील तरुणांना वसंतराव नाईक चौकामध्ये गंभीरपणे मारहाण करण्यात आली व दोन गटांमध्ये मोठा वाद निर्माण झाला. बंजारा समाजाच्या अस्मितेचा प्रश्न असणाऱ्या स्व. वसंतराव नाईक चौकाचे सुशोभीकरण करत असताना अडथळा निर्माण करणाऱ्या विरोधात कठोर कारवाई करण्यात यावी यासाठी वडवणी तालुक्यातील सर्व बंजारा समाजाच्या वतीने वडवणी शहर पूर्णपणे कडकडीत बंद ठेवण्यात आले. या बंदमध्ये वडवणी शहरातील व्यापाऱ्यांनी देखील आपले दुकानी बंद ठेवले.

# डॉक्टरकीचं शिक्षण घेणाऱ्या दोन विद्यार्थ्यांचा स्विमिंग पुलमध्ये बुडून मृत्यू





## डॉक्टर होण्याचे स्वप्न राहिले अपूर्ण; सर्वत्र हळहळ व्यक्त!

गेवराई । प्रतिनिधी

बुलढाणा जिल्ह्यातील चिखली शहरातील शासकीय क्रीडा संकुलात असलेल्या स्विमिंग पूलमध्ये बुडून दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. चिखली शहरातीलच रामसिंग चुनीवाले आयुर्वेदिक महाविद्यालयात द्वितीय वर्षाला बीएएमएस शिक्षण घेणारे हे दोन विद्यार्थी होते. सुरेश सुनील पानखडे (ता. गेवराई, जि.बीड) व विवेक वायले (ता. अकोट, जि.अकोला) असे मृत झालेल्यांचे नावे आहेत.


पान २ वर

# कासारपाटी, तरनळी, कोल्हेवाडी, मैंदवाडी, कोल्हेवाडी रस्त्याची झाली चाळणी



## प्रवाशांचे हाल; रस्ता दुरुस्तीची मागणी

धारूर । प्रतिनिधी
धारूर शहरालगत कासारपाटी पासून ते तरनळी, मैंदवाडी कोल्हेवाडी या रस्त्याची दुरवस्था झालेली दिसून येत आहे या ठिकाणी वाहनधारकांना रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमुळे नाहक त्रास सहन करावा लागत असून या रस्त्याकडे लोकप्रतिनिधींचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष दिसत असून याकडे लक्ष देऊन तात्काळ रस्त्याचे काम चालू करावे अशी मागणी नागरिकांतून होत असून प्रवाशातून नाराजी व्यक्त होत आहे.
कासारपाटीपासून ते तरनळी कोल्हेवाडी या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्यामुळे या रस्त्याची दुरावस्था झाल्याचे चित्र दिसून येत आहे, कासारी तरनळी कोल्हेवाडी या खेड्यांना धारूर जवळ असल्याने ते धारूर या ठिकाणी ये जा करण्यासाठी रस्ता महत्वाचा असतो आणि तोच मुख्य रस्ता खराब झाल्यामुळे त्या ठिकाणी ठिकाणाहून येन्या जाण्यासाठी प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. याकडे लोकप्रतिनिधींनी लक्ष देऊन तात्काळ रस्त्याचे काम मार्गी लावावे अशी मागणी प्रवाशी नागरिकांतून होत आहे.



क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरातील त्यांच्या व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे बीड जिल्हाच्या वतीने अभिवादन करताना शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर, तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, किसान सेनेचे तालुका संघटक भिमराव कुटे, उपतालुकाप्रमुख दादासाहेब सोनवणे, सर्व प्रमुख दत्ता सुरवसे.



क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आज शिवसंग्राम भवन येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर आप्पा कोलंगडे, जिल्हाध्यक्ष सुभाष जाधव सर, बीड तालुकाध्यक्ष पंडित माने, ज्येष्ठ नेते तथा खरेदी विक्री संघाचे संचालक गोपीनाथ बापू घुमरे, युवक जिल्हाध्यक्ष सुनील कुटे, शहर उपाध्यक्ष शेषराव तांबे, प्रसिद्धी प्रमुख मनोज जाधव, शिवसंग्राम नेते पंडित शेंडगे सर, शिवसंग्राम नेते देविदास मेंगडे, शहर सहसंघटक गणेश धोंडरे, शिवसंग्राम नेत्या सौ. संगीताताई ठोसर व अन्य शिवसंग्राम नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या रत्नागिरी जिल्हा कार्याध्यक्ष पदी अंगद चंद्रकांत आबुज यांची निवड करण्यात आली. यावेळी त्यांना शुभेच्छा देताना शिक्षक संघाचे नेते संभाजी तात्या थोरात व राज्य कार्यकारणी व आदी उपस्थित होते.

## क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त भव्य समता रॅली व अभिवादन सभा



बीड । प्रतिनिधी
अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने आयोजित क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले सार्वजनिक जयंती महोत्सव प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून समता ज्योत रॅली काढण्यात आली.
ही समता ज्योत क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले पुतळ्यापर्यंत घेऊन येताना समता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष तथा राज्य सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांच्यासोबत प्रमुख पदाधिकारी दिसत असून दुसऱ्या छायाचित्रात क्रांतीसुर्य महात्मा फुले यांना जयंती निमित्त अभिवादन करताना ॲड. सुभाष राऊत यांच्यासह युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर, नगरसेवक शुभम धूत, जेष्ठ पत्रकार ड. संदीप बेदरे, परीट समाजाचे ज्येष्ठ नेते गणेश जगताप, प्रा. प्रदीप रोडे, बारा बलुतेदार संघटनेचे प्रकाश कानगावकर, राजू ताटे, प्रशांत वासनिक, माजी नगरसेवक नामदेवराव दुधाळ, प्रा. अंकुश निर्मळ, अमर ढोणे, डॉ. संजय तांदळे, श्रीरामनाना ढवळे, रणजीत पाटील, प्रा. लक्ष्मण गुंजाळ, रफिक बागवान, समता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन साखरे, समता परिषद शहराध्यक्ष निखील शिंदे, युवा नेते नितीन राऊत, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय काळे, दिलीप बेंद्रे, रिपाईचे किसन तांगडे, गौतम चोपडे, अमर विद्यागर, बीड शहर बचाव मंचचे नितीन जायभाये, नवनाथ दोडके, निखील सवाई, रंजित सोन्नर, शेखर पवार, भारत कांबळे, पत्रकार प्रचंड साळुंके, क्रांतीसुर्य महात्मा फुले सार्वजनिक जयंती उत्सव अध्यक्ष अजिंक्य सुरवसे, उपाध्यक्ष निलेश राऊत, सचिव अजय काळे, सहसचिव दत्ता राऊत, कोषाध्यक्ष विशाल राऊत, सहकोषाध्यक्ष सुरज राऊत, ऋषिकेश आखाडे, दीपक थोरात, संतोष यादव, ज्ञानेश्वर राऊत, अजय भानुसे, कृष्णा मेत्रे, अमोल राऊत, अभिजीत दहिवाळ, अविनाश शिंदे, अभिजीत मुंडे यांच्यासह फुले, शाहू, आंबेडकर प्रेमी व सर्व समाजातील नागरिक, समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## घाटनांदुर ते अंबाजोगाई रेल्वे मार्गासाठी केंद्रीय मंत्री पासवान यांना निवेदन : राजेश वाहुळे

शिर्डी । प्रतिनिधी
केंद्रीय अन्न प्रक्रिया मंत्री चिराग रामविलास पासवान हे दिनांक १० ४ २०२५ रोजी महाराष्ट्रात शिर्डी येथे सहकुटुंब दर्शनासाठी आले



असता मराठवाड्याच्या वतीने त्यांची भेट घेऊन अनेक मागण्यांचे निवेदन देण्यात आले यामध्ये प्रामुख्याने घाटनांदुर ते अंबाजोगाई रेल्वे मार्गाची मागणी करण्यात आली तसेच सोमनाथ सूर्यवंशी शिरूर कासार येथील झापेवाडी पारधी वस्ती वरील हल्ल्याचा व घरे पेटवून दिल्या संदर्भातील माहिती व गायरान प्रकरणी दलितावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या संदर्भातील पूर्ण माहिती देण्यात आली.
मराठवाड्यातील बेरोजगारी विषयी मुद्दे मांडून युवकांच्या हाताला काही काम मिळावे या उद्देशाने अन्न व प्रक्रिया मंत्रालयाच्या वतीने उद्योग उभारणी संदर्भामध्ये केंद्रीय मंत्री शिरापासून यांच्याशी सविस्तर सकारात्मक चर्चा झाली या आशयाचे निवेदन जमुई मतदार संघाचे खासदार श्री अरुण भारती जी यांना देताना भीमशक्ती सामाजिक संघटनेचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भीमराव सरवदे साहेब लोक जनशक्ती पार्टीचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे लोक जनशक्ती पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष अशोक भैया काळे परळी विधानसभा मतदारसंघाचे तालुकाध्यक्ष विशाल भैया शेवाळे भीमशक्तीचे अंबाजोगाई तालुका अध्यक्ष सुमित भैय्या आवाडे भीमशक्तीचे अंबाजोगाई तालुका उपाध्यक्ष शुभम तर्फे व इतर आदी उपस्थित होते.

पान १ वरून...

## डॉक्टरकीचं शिक्षण घेणाऱ्या दोन विद्यार्थ्यांचा स्विमिंग पुलमध्ये बुडून मृत्यू...

काल सायंकाळी शासकीय क्रीडा संकुलात सुरु असलेल्या रेनबो स्विमिंग पूलमध्ये पोहण्यासाठी गेले होते. मात्र, अचानक ते बुडून मरण पावले. त्यांना तात्काळ उपस्थितांनी चिखली येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले होते. घटनेची माहिती मिळताच चिखली पोलीस ठाण्याचे ठाणेदार संग्राम पाटील पथकासह घटनास्थळी पोहोचले. त्यांनी तत्काळ कारवाई सुरू केली. दोन्ही विद्यार्थ्यांना क्रीडा संकुल परिसरत असलेल्या नजीकच्या भराड रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी दोघांनाही मृत घोषित केले. या घटनेची माहिती मृतांच्या नातेवाईकांना देण्यात आली.

# तलवाडा येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतीय घटनेच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी

महात्मा जोतिबा यांचे पूर्ण नाव जोतीराव गोविंदराव फुले. यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला. जोतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. जोतिबांचे आजोबा शेरीबा गोऱ्हे माधवराव पेशव्यांच्या दरबारात सजावटीचे कामकाज करत असत. यावर पेशव्यांनी त्यांना ३५ एकर जमीन फुलांच्या व्यवसायासाठी दिली होती. यानंतर फुलांच्या व्यवसायामुळे गोऱ्हे घराण्याला फुले म्हणून ओळखले जाऊ लागले. आजोबांच्या मृत्यूनंतर जोतिबांचे काका राणोजींनी सदरील ३५ एकर जमीन हडप केली. यामुळे नंतर जोतिबांचे वडील गोविंदराव हे भाजीपाल्यांचा व्यवसाय करू लागले. त्यांचे मूळ गाव कटगुण तालुका खटाव जिल्हा सातारा हे होते.
महात्मा फुले हे मराठी लेखक, विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी सत्यशोधक समाज नावाची संस्था स्थापन केली. शेतकरी आणि बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली आणि महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. जनतेने मुंबईतील सभेत १८८८ मध्ये त्यांना महात्मा ही उपाधी बहाल केली होती.

### महात्मा जोतिबा फुले यांची प्राथमिक माहिती

महात्मा जोतिबा फुले यांचे पूर्ण नाव जोतीराव गोविंदराव फुले. यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला. जोतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. जोतिबांचे आजोबा शेरीबा गोऱ्हे माधवराव पेशव्यांच्या दरबारात सजावटीचे कामकाज करत असत. यावर पेशव्यांनी त्यांना ३५ एकर जमीन फुलांच्या व्यवसायासाठी दिली होती. यानंतर फुलांच्या व्यवसायामुळे गोऱ्हे घराण्याला फुले म्हणून ओळखले जाऊ लागले. आजोबांच्या मृत्यूनंतर जोतिबांचे काका राणोजींनी सदरील ३५ एकर जमीन हडप केली. यामुळे नंतर जोतिबांचे वडील गोविंदराव हे भाजीपाल्यांचा व्यवसाय करू लागले. त्यांचे मूळ गाव कटगुण तालुका खटाव जिल्हा सातारा हे होते.
महात्मा फुले हे मराठी लेखक, विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी सत्यशोधक समाज नावाची संस्था स्थापन केली. शेतकरी आणि बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली आणि महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. जनतेने मुंबईतील सभेत १८८८ मध्ये त्यांना महात्मा ही उपाधी बहाल केली होती. महात्मा फुलेंवर जुलै १८८७मध्ये ज्योतिराव फुले यांना पक्षाघाताचा आजार झाला. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुलेंचे मध्यरात्री २ वाजता पुणे येथे वयाच्या ६३ व्या वर्षी निधन झाले. अत्यंयात्रेच्यावेळी जो टिटवे धरतो त्याला वारसा हक्क मिळत असल्याने ज्योतिरावाचे पुतणे आडवे आले, आणि ज्योतिरावांचा दत्तक पुत्र यशवंतरावांना विरोध करू लागले. त्यावेळेस सावित्रीबाई धैर्याने पुढे आल्या व स्वत: टिटवे धरले. अंत्ययात्रेच्या अग्रभागी चालल्या आणि स्वत:च्या हाताने ज्योतिरावांच्या पार्थिवाला अग्नी दिला. यशवंतराव हा विधवेचा मुलगा असल्याने त्याला कुणीही मुलगी द्यायला तयार नव्हते. तेव्हा कार्यकर्ता ज्ञानोबा कृष्णाजी ससाणे यांच्या राधा नावाच्या मुलीशी ४ फेब्रुवारी १८८९ रोजी विवाह यशवंतचा करून दिला. यशवंत व राधा यांचा हा विवाह महाराष्ट्रातील पहिला आंतरजातीय विवाह होय.

### महात्मा जोतिबा फुलेंचे बालपण आणि शिक्षण

जोतिबा फुले यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होते. त्याच गावी महात्मा फुलेंचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीराव केवळ नऊ महिन्यांचे होते, तेव्हा त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांचा विवाह वयाच्या बाराव्या वर्षी सावित्रीबाई यांचेशी झाला. प्राथमिक शिक्षण पुणे येथील पंतोजींच्या



शाळेत मराठी माध्यमातून झाले. यानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. इ.स. १८४२ मध्ये वयाच्या १४ व्य वर्षी माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये इंग्रजी माध्यमात त्यांनी प्रवेश घेतला. बुद्धी अतिशय तल्लख, त्यामुळे पाच-सहा वर्षातच त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला. महात्मा जोतिबा फुले यांना मराठी, इंग्रजी, उर्दू, कन्नड, तामिळ, गुजराती इत्यादी भाषा येत असत.
सावित्रीबाई जोतीराव फुले यांच्याबद्दल महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले महात्मा जोतिबा फुलेंचे शैक्षणिक कार्य अहमदनगर मिशनरी स्कूल व या स्कूलच्या प्रा. मिस फरारकडून प्रेरणा घेऊन ३ ऑगस्ट १९४८ रोजी जोतिबांनी पुण्यातील बुधवार पेठेत तात्यासाहेब भिडेंच्या वाड्यात भारतातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. पहिल्या दिवशी या शाळेत ८ मुली उपस्थित होत्या. महात्मा जोतिबांनी सावित्रीबाईंना साक्षर करून भारतातील पहिली स्त्री शिक्षिका व पहिली प्रशिक्षित मुख्यध्यापिका बनविले. शूद्रांसाठी शिक्षणाच्या कार्यामुळे झालेला विरोध बघून जोतिबांना त्यांच्या पत्नींसोबत गृहत्याग करावा लागला. यानंतर त्यांनी पुण्यातील गंजपेठ येथील उस्मानशेख यांच्या वाड्यात मुक्काम केला.
१८५० - ३ जुलै १८५१ रोजी चिपळूणकरांच्या वाड्यात मुलींची दुसरी शाळा, तर १७ सप्टेंबर १८५१ रोजी रास्ता पेठेत तिसरी शाळा स्थापन केली. यानंतर १५ मार्च १८५२ रोजी वेताळपेठेत भिडे यांच्या वाड्यात मुलींची अजून एक शाळा सुरु केली. १८५२ साली नेटिव्ह फिमेल स्कूल सभा पूना लायब्ररीची स्थापना केली.
१९ मे १८५२ रोजी महात्मा फुलेंनी वेताळ पेठेत अस्पृश्यांसाठी भारतातील पहिली शाळा सुरू करून धुराजी चांभार व गणू शिवाजी मांग हे दलित शिक्षक अध्यापनासाठी नेमले. यावेळी त्यांचे सहकारी सदाशिव गोवंडे, सखाराम परांजपे, विठ्ठल वाळवेकर, वामन प्रभाकर भावे, विनायक भांडारकर यांनी त्यांना मोलाची मदत केली.



पत्रकार सुरेश गांधले
विशेष लेखन

शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्वपूर्ण कार्याबद्दल पुणे महाविद्यालयाचे (सध्याचे डेक्कन कॉलेज) प्रा. मेजर थॉमस कँडी यांच्या अध्यक्षतेखाली पुण्याच्या विश्रामबाग वाड्यात सरकारी विद्या खात्याकडून जोतिबांचा जाहीर सत्कार करण्यात आला होता. महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या काही मित्रांना सोबत घेऊन सप्टेंबर१८५३ मध्ये महार, मांग आदी लोकांना शिकविण्यासाठी 'मंडळी' नामक संस्था स्थापन केली. तर १९५५ मध्ये प्रौढांसाठी देशातील पहिली 'रात्र शाळा' त्यांनी स्थापन केली. १८८२ साली भारतातील शिक्षण विषयक स्थापन करण्यात आलेल्या हंटर कमिशनसमोर फुलेंनी साक्ष देऊन १२ वर्षांखालील मुलामुलींना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे, शिक्षक प्रशिक्षित असावे, शिक्षक बहुजनातीलही असावे, जीवनोपयोगी व्यवहारी शिक्षण द्यावे, आदिवासी जाती जमातींना शिक्षणात प्राधान्य, शेतीचे व तांत्रिक शिक्षण द्यावे, वसूल केलेल्या शेतसाऱ्याची रक्कम ही शेतकऱ्यांच्या शिक्षणावर खर्च करावी, महाविद्यालयीन शिक्षण जीवनातील गरजा भागविणारे असावे अशा महत्त्वपूर्ण मागण्या केल्या. प्राथमिक शिक्षण मोफत, सार्वजनिक व सक्तीचे केले जावे अशी मागणी करणारे महात्मा जोतिबा फुले हे आशिया खंडातील पहिले शिक्षण तज्ञ होते.

### महात्मा जोतिबा फुले यांच्या सामाजिक सुधारणा

१८९५ साली फुलेंनी वयाच्या२८ व्या वर्षी पुण्यात 'तृतीय रत्न' हे पहिले नाटक लिहिले. हे जोतिबांचे पहिले पुस्तक व मराठीतील पहिले सामाजिक नाटक म्हणून ओळखले जाते. २८ जानेवारी १८६३ रोजी पुणे येथील आपल्या राहत्या घरी भारतातल्या पहिल्या बाल हत्या प्रतिबंध गृहाची स्थापना केली. यानंतर पंढरपुरातही अशा गृहाची स्थापना केली. पुणे येथील बालहत्या प्रतिबंधगृहात काशीबाई नातू महिलेने एका मुलाला जन्म दिला. पुढे १८७३ मध्ये याच मुलास फुले दाम्पत्याने दत्तक घेऊन त्याचे नाव यशवंत ठेवले. हाच यशवंत नंतर डॉक्टर झाला. १८७७ साली पुण्यातील धनकवडी येथे दुष्काळपीडित विद्यार्थ्यांसाठी कॅम्प उभारला. तसेच 'व्हिक्टोरिया अनाथ आश्रमाची' स्थापना केली. विधवा स्त्रियांच्या केशवपनाची प्रथा बंद पाडण्यासाठी तळेगाव ढमढेरे व ओतूर येथे न्हाव्यांचा एक दिवसीय संप घडवून आणला. ८ मार्च १८६४ रोजी गोखलेंच्या बागेत विधवा पुनर्विवाह घडवून आणला.

### महात्मा जोतिबा फुलेंचे साहित्य

महात्मा फुले यांनी लिहलेला 'सार्वजनिक सत्यधर्म' हा सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. या समाजाचे मुखपत्र म्हणून 'दीनबंधू' हे साप्ताहिक चालविले जात असे. तुकारामाच्या अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक 'अखंड' रचले. आपला 'गुलामगिरी' ग्रंथ अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना त्यांनी समर्पित केला. 'अस्पृश्यांची कैफियत' हा महात्मा फुलेंचा अप्रकाशित ग्रंथ आहे. सार्वजनिक सत्यधर्म हा त्यांचा ग्रंथ त्यांच्या मृत्यूनंतर इ.स. १८९१ मध्ये प्रकाशित झाला.


विद्येविना मती गेली ।
मतीविना नीती गेली ।
नीतीविना गती गेली ।
गतीविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले।
इतके अनर्थ एका अविद्येने केले

# समाज मंदिरासाठी जागा उपलब्ध करुन मंदिर बांधू : आ.विजयसिंह पंडित

## गेवराईतील गवळी समाज बांधवाचे पंडित यांना निवेदन देऊन मागणी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील विरशैव लिंगायत गवळी समाजाला आजवर हक्काचे समाज मंदिर व जागा मिळाली नव्हती,मात्र आ.विजयसिंह पंडित यांच्यामुळे गवळी समाज बांधवांना आता हक्काचे समाज मंदिर व जागा मिळणार आहे. शुक्रवार रोजी गवळी समाज बांधवांनी आ.विजयसिंह पंडित यांची भेट घेत निवेदन दिले. यावेळी समाज बांधवांना उत्तर देताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, गवळी समाज बांधवांना लवकरच गेवराई शहरात समाज मंदिरासाठी जागा उपलब्ध करुन समाजाचे मंदिर उभारण्यात येईल असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले. दरम्यान मागिल अनेक वर्षांपासून हि मागणी गवळी समाज बांधव विविध राज्यकर्त्यांना करत आले आहेत. मात्र आ.विजयसिंह पंडित यांनी गवळी समाजाच्या मंदिरासाठी जागा व मंदिर उभारण्यासाठी आता पुढाकार घेतल्याने शहरातील गवळी समाज बांधवांकडून आनंद व्यक्त केला जात आहे. विरशैव लिंगायत गवळी समाज बांधवांचे गेवराई विधानसभा मतदारसंघात केवळ गेवराई शहरातच दुध व्यवसायामुळे वास्तव्य आहे. शहरात गधळी समाज बांधवांच्या मंदिरासाठी जागा देण्यात येऊन मंदिर उभारण्यात यावे यासाठी मागिल अनेक वर्षांपासून विविध राज्यकर्त्यांना समाज बांधवांनी मागणी केली. मात्र या मागणीकडे राज्यकर्त्यांनी दुर्लक्ष करत समाज बांधवांचा निवडणुकीपुरता वापर केला गेला. आ.विजयसिंह पंडित हे आमदार होताच शहरातील गवळी समाजाच्या त्यांच्याकडून अशा पल्लवीत झाल्या आहेत. तसेच माजी आमदार अमरसिंह पंडित यांना देखील पंधरा दिवसांपुर्वी समाज बांधवांनी मागणी करताच त्यांनी या मागणीसाठी सकारात्मक भुमिका घेतली आहे. शुक्रवार रोजी शहरातील गवळी समाज बांधवांनी आ.विजयसिंह पंडित यांची कृष्णाई येथे भेट घेतली. गेवराई शहरात गवळी समाज बांधवांसाठी समाजाच्या मंदिरासाठी जागा उपलब्ध करुन द्यावी, तसेच मंदिर बांधण्यासाठी निधी देण्यात यावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी आ.विजयसिंह पंडित यांनी गवळी समाज बांधवांच्या मागणीला उत्तर देताना सांगितले की, गेवराई शहरात गवळी समाजाच्या मंदिरासाठी लवकरच जागा उपलब्ध करुन देऊ, तसेच मंदिर बांधण्यासाठी निधी देण्यात येईल असे आश्वासन आ.पंडित यांनी यावेळी दिले. यावेळी नारायण अवधुत, भागवत परळकर, सुंदरआप्पा दंहिडे, दत्ता हादगुले, बाबा अवधुत, रामेश्वर अवधुत, शंकर हादगुले, बबन परळकर, सोमनाथ नामदेव, शंकर हादगुले, मनोज हादगुले आदिंसह समाज बांधव उपस्थित होते. दरम्यान माजी आमदार अमरसिंह पंडित व आ.विजयसिंह पंडित यांनी आता याबाबत लक्ष घातल्याने या मागणीला लवकरच यश येणार असल्याने समाज बांधवांकडून आनंद व्यक्त केला जात आहे.



### ब्रह्मिभुत ढेकळे महाराजांनी लावलेलं रोपट गगनाला गेलं..!

## बेलखंडी येथील ४७ व्या नामसप्ताहाची उत्साहात सांगता

बीड । प्रतिनिधी

मौजे बेलखंडी येथील प्रसिद्ध श्री. क्षेत्र बेलखंडेश्र्वर महादेव संस्थान जागृत देवस्थान असून, संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. संत परंपरेचा वारसा असलेल्या या गावाला ब्रह्मिभूत, गु. साहेबराव महाराज ढेकळे यांनी सुरू केलेला अखंड हरिनाम सप्ताहाला आज ४७ वर्षे पूर्ण झाली. लवकरच या नाम सप्ताहाचा रौप्य महोत्सव होत असून, ब्रह्मिभूत ढेकळे महाराजांची लावलेलं नामाच हे रोपट गगनाला गेलं. असे गौरोद्गार सप्ताहाचा सांगता प्रसंगी श्री. क्षेत्र बंकटस्वामी संस्थांचे मठाधिपती महंत ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी व्यक्त केले. शेकडो वर्षापासून भंडारा स्वरूपात याठिकाणी नाम महोत्सवाची परंपरा होती. त्यांनतर ब्रह्मिभूत ढेकळे महाराजांनी या ठिकाणी येऊन अखंड हरिनाम सप्ताहाची सुरवात केली. परिसरातील भक्तांना भगवंतांच्या नामाची गोडी लावली, ढेकळे महाराजांची ३५ वी पुण्यतिथी व सप्ताहाला आज ४७ वर्षे पूर्ण झाली.
ह.भ.प. भक्तीदास महाराज शिंदे यांच्या शुभहस्ते व ह.भ.प. परमेश्वर महाराज माने, ह.भ.प. दत्ता महाराज बडगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या सप्ताहामध्ये ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, संगीत शिवपुराण कथा, हरिपाठ, शिवमहीम्न आदी कार्यक्रमाबरोबर, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज, ह.भ.प. भगवान महाराज शास्त्री, ह.भ.प. सत्यवान महाराज लाटे, ह.भ.प. राजू महाराज चोरडिया, ह.भ.प. परमेश्वर महाराज माने, ह.भ.प. भक्तीदास महाराज शिंदे, महंत स्वामी योगीराज महाराज, ह.भ.प. विष्णू महाराज तांदळे, ह.भ.प. अशोक महाराज शास्त्री आदी संत महांतांची कीर्तने झाली.



## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त माजलगाव शहरात समता ज्योत रॅली चे भव्य आयोजन

माजलगाव / प्रतिनिधी

दिनांक १३ एप्रिल २०२५ रोजी भारतरत्न, संविधान निर्माता, महान समाजसुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त समता ज्योत रॅली चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली माजलगाव पोलीस प्रशासन आणि शिव–फुले–शाहू–आंबेडकरी अनुयायी, माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली जात आहे.




ही रॅली रात्री ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून निघून डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, भीमनगर येथे समाप्त होणार आहे. या रॅलीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा व विचारसरणीचा जागर तसेच सामाजिक समतेचा संदेश पोहचविण्यात येणार आहे. उपविभागीय अधिकारी मा.गौरव इंगोले व पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतल यांनी सर्व नागरिकांना या रॅलीमध्ये शिस्तबद्ध व शांततामय पद्धतीने मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.
रॅलीदरम्यान पोलीस बंदोबस्त, वाहतूक नियंत्रण व आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात येणार आहेत.
समतेचा दीप घेऊन सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने टाकलेले हे पाऊल केवळ डॉ.आंबेडकरांच्या जयंतीपुरते मर्यादित नसून, समतेच्या समाजरचनेच्या दिशेने एक प्रभावी पाऊल ठरेल.
ही रॅली केवळ एक मिरवणूक न राहता, सर्वधर्मसमभाव, बंधुता, न्याय आणि स्वातंत्र्य या संविधानातील मूल्यांचे दर्शन घडविणारी प्रेरणादायी घटना ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, रॅलीच्या यशस्वीतेसाठी सहकार्य करावे, आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करावे, असे आवाहन आयोजक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## महामानव अभिवादन ग्रुपच्या मोफत शिकवणी वर्गात वाचाल तर वाचाल तर्फे शालेय साहित्याचे वाटप



बीड येथील मिलिया शाळेत लिपिकपदी अजमत खान मुसाखान यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांच्या सत्कार करताना शाळेचे मुख्याध्यापक फैसल चाऊस उपमुख्याध्यापक मुजाहिद चाऊस बदर सर शोएब सर समीर सर जुनेद सर व आदी शिक्षक दिसत आहेत.

बीड । प्रतिनिधी

महामानव अभिवादन ग्रुप २०२० पासून राजगृह बुद्धविहार भीम नगर जुना मोंढा रोड परिसर व प्रकाश आंबेडकर नगर बीड येथे प्राथमिक व माध्यमिक विद्यार्थ्यांकरिता मोफत शिकवणी वर्ग चालविण्यात आहेत. वार्षिक परीक्षेच्या निमित्ताने दोन्हीही वर्गातील ५३ विद्यार्थ्यांना परीक्षेकरता आवश्यक ते शालेय साहित्य (कंपास, रायटिंग पॅड व पेन) चे वाटप वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालातर्फे महामानव ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले, डॉ.जगदीश, वाघमारे शिक्षक रवींद्र टेकाळे, शिक्षिका विशाखा वाघमारे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले व परीक्षेकरिता शुभेच्छा देण्यात आल्या.
याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष डी.जी. वानखेडे म्हणाले की, नियोजित अभ्यासाकरिता शिक्षक अतुलनीय मेहनत घेत असून विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व, गायन व चित्रकला या कलागुणाकडेही उत्कृष्ट प्रकारे मार्गदर्शन करत आहेत व मेहनत घेत आहेत. त्याबद्दल गुरुजनांचे महामानव अभिवादन ग्रुप तर्फे व वाचनालयातर्फे त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिकवणी वर्गाबद्दल आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थिनी कु.अमृता चौगुले हिने आज पौर्णिमेच्या राती – दीनदुबळ्यांच्यासाठी भीम माझा ग दिल्लीत भाषण देई! असे हृदयपर्शी भीम गीत गाईले सर्व उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. तसेच भूमिका चौगुले या विद्यार्थिनीने शिकवणी वर्गाचा कसा फायदा होत आहे, ते आपल्या मनोगतात व्यक्त केले. जी.एम. भोले यांनी मंत्रमुग्ध करणाऱ्या गीताबद्दल अमृता चौगुले हिचा रोख रक्कम देऊ सत्कार केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष पुढे म्हणाले की, शिकवणी वर्गाचा विद्यार्थी योग्य प्रकारे लाभ घेत आहेत, याबद्दल समाधान व्यक्त केले. इथून पुढे तिसरा मोफत शिकवणी वर्ग गरजू व होतकरू विद्यार्थ्यांकरिता बीड शहरात सुरू करण्याचा मानस व्यक्त केला.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. जगदीश वाघमारे यांनी केले. कार्यक्रमास कॅप्टन राजाभाऊ आठवले, डी.एम.राऊत, सेवानिवृत्त एल.आय.सी. प्रबंधक यु.एस.वाघमारे प्रा. अशोक गायकवाड, प्रशांत वासनिक, के.एस. वाघमारे, बी.डी. तांगडे, एस.एस. सोनवणे, संघमित्रा वाघमारे व बहुसंख्येने सदस्य, विद्यार्थी उपस्थित होते. सरणातयने कार्यक्रमाची सांगत झाली.



## फुलसिंग नाईक महाविद्यालय पुसद येथे पदवीदान सोहळा उत्साहात साजरा



पुसद । प्रतिनिधी

दि.९/०४/२०२५ रोजी फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद येथे सत्र २०२३–२४ चा पदवीदान सोहळा संपन्न झाला. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या निर्देशानुसार दरवर्षी हा पदवीदान सोहळा महाविद्यालयात संपन्न होत असतो. त्या अनुषंगाने यावर्षी सुद्धा पदवीदान सोहळा फार उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.प्रल्हाद वावरे सर हे होते तर सदर कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून डॉ.एम.बी. कदम (प्राचार्य, गोपिकाबाई गावंडे महाविद्यालय, उमरखेड) तसेच मराठी विभागप्रमुख प्रा. अभय जोशीसर हे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. कदम सरांनी विद्यार्थांना नव्या काळाची पावलं ओळखुन आपला विकास करवून घ्यावा असे आवाहन केले.
विचारमंचावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय भोयर, प्रा. डॉ. उल्हास चव्हाण, प्रा.डॉ. दत्ता पवार, प्रा. अभय जोशी, प्रा. महेश हंबर्डे, प्रा.डॉ. अनिल दुधे, तसेच उत्कृष्ट संचालन करणारी बी. एस्सी. फायनलची विद्यार्थीनी कु.सपना हिंगमीरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून एकमेव मायनर प्रोजेक्ट शांसन झालेले महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय भोयर सर यांचा पाहूण्यांच्या हस्ते शॉल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.
कला, वाणिज्य, विज्ञान या तिन्ही शाखांमधील १८३ पैकी जवळजवळ १०० विद्यार्थी पदवी ग्रहन करण्यासाठी सभागृहात उपस्थित होते. पदवीदान सोहळ्याचे समन्वयक प्रा.डॉ. अनिल दुधे व त्यांचे सहकारी यांनी अत्यंत सुयोग्य नियोजन करून हा कार्यक्रम यशस्वी केला. महाविद्यालयातील तिन्ही शाखेचे वरिष्ठ प्राध्यापक याप्रसंगी उपस्थित होते. मंचावरील सर्व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थांना पदवीदान केल्या गेले. विद्यार्थांचे कौतूक करून भावी जीवनासाठी विद्यार्थांना शुभेच्छा दिल्या.

## रावबा गजमलच्या सांगळा चित्रपटाला युगयात्रा पुरस्कार; जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

गेवराई । प्रतिनिधी

मिलिंद नागसेनवन स्टुडंटस वेल्फेयर असोसिएशन, भीमजयंतीनिमित्त पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या आजी–माजी विद्यार्थ्यांद्वारे २८ ते ३० मार्च २०२५ दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथील नागसेनवन मिलिंद महाविद्यालयात आयोजित नागसेन फेस्टिव्हल्समध्ये २०२५ या वर्षीचा 'युगयात्रा पुरस्कार' रावबा गजमल दिग्दर्शित सांगळा या चित्रपटाला प्रदान करण्यात आला. तसेच सतीश धुताडमल दिग्दर्शित पाखरं या लघुपटालादेखील पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतून लिहिल्या गेलेल्या 'युगयात्रा' या नाटकाच्या नावाने दरवर्षी दिला जातो. यावर्षी पुरस्काराचे ९ वे वर्ष आहे. युगयात्रा नाटकाच्या प्रेरणेतून दलित साहित्याची मूहूर्तमेढ रोवली गेल्याने पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा सुवर्ण इतिहास साहित्य, कलाक्षेत्रात निर्माण झाला. सांगळा या मराठी चित्रपटाबद्दल अभिमानाने बोलताना आयोजकांनी आपली कलाकृती ही सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारी, माणसाला माणसाशी जोडणारी असल्याने युगयात्राचा इतिहास आपल्या निर्मितीतून पुन्हा अधोरेखित होत असल्याने युगायात्राच्या या प्रवासातील सहपथिक या नात्याने कृतज्ञतापूर्वक आपली नोंद घेऊन युगयात्रा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येत आहे. शोषित पीडितांच्या दुःखाला जगाच्या रंगभूमीवर मांडण्याचा हा प्रवास मंगलमय होवो अशा शुभेच्छा आयोजकांनी दिल्या. बीड जिल्ह्याच्या कला आणि सांस्कृतिक क्षितिजावर एक तेजस्वी तारा अधिक तेजाने चमकू लागला आहे. गेवराई तालुक्यातील किनगाव सारख्या ग्रामीण भागातील तरुण लेखक–दिग्दर्शक – अभिनेता रावबा गजमल यांच्या 'सांगळा' या चित्रपटाने 'युगयात्रा' पुरस्काराचा मान मिळवून केवळ बीड जिल्ह्यालाच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राला अभिमानित केले. या युवा कलाकारांची ही यशोगाथा प्रेरणादायी आणि ग्रामीण भागातील प्रतिभाशक्तीचा ज्वलंत दाखला आहे.
रंगकर्मी रावबा गजमल, ज्यांनी मराठवाड्यातील नाट्यक्षेत्रात आपल्या लेखन–अभिनयाने आणि दिग्दर्शनाने एक खास ओळख निर्माण केली आहे, त्यांनी 'सांगळा'च्या माध्यमातून चित्रपटसृष्टीत यशस्वी पदार्पण केले आहे. 'सांगळा' केवळ एक चित्रपट नाही, तर तो ग्रामीण जीवनातील वास्तव आणि मानवी भावनांचा एक संवेदनशील आरसा आहे. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात २५ लाखाचा मानाचा 'संत तुकाराम' पुरस्कार पटकावून या चित्रपटाने समीक्षकांची आणि रसिकांचीही वाहवा मिळवली आहे. एका नाट्यकर्मीचा कॅमेऱ्याच्या मागचा प्रवास निश्चितच कौतुकास्पद आहे आणि 'सांगळा' त्याची साक्ष आहे.



बीड जिल्ह्याची भूमी खरंच धन्य आहे, जिथे अशा प्रतिभावान कलाकाराचा जन्म झाला. प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या कलागुणांच्या जोरावर या युवा कलाकाराने राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांची ही 'युगयात्रा' खरंच खूप सकारात्मक आहे आणि इतर नवोदित कलाकारांना निश्चितच प्रेरणा देणारी आहे. अभिनेते कैलास वाघमारे, पद्मभूषण सुधाकर थोरवे, चित्रकार संध्या गोखले, आयोजक सचिन निकम यावेळी हजर होते. सांगळा चित्रपटाला युगयात्रा पुरस्कार मिळाल्याबद्दल जेष्ठ अभिनेते अ‍ॅड. कमलाकर देशमुख, डॉ प्रकाश चिंचोलीकर, शाहीर रामभाऊ मुळे, विजयकुमार बोर्डे, अभिनेते नंदू माधव, प्रकाश दावणगिरे, श्रीकृष्ण कनपुरे, अ‍ॅड. सुभाष निकम, प्रा.राजेंद्र बरकसे, प्रकाश भुते, राजेंद्र आतकरे, दिलीप जोशी, प्रा. डॉ. बापू घोक्षे, डॉ. सुधीर निकम, प्रशांत रुईकर, दिनकर शिंदे, रंजित सराटे, मुकुंद टाक, विलास सोनवणे, संगीता भावसार, प्रा. असलम बागवान, अमोल धोंडगे, परमेश्वर शिंदे, संतोष कसबे, रोहित पुराणिक, दीपक गिरी, विवेक शर्मा, शिवकुमार सोनवणे यांच्यासह जेष्ठ व नवोदित कलाकारांनी अभिनेता रावबा याचे अभिनंदन केले.

# कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी लवकरच नदीपात्रात सोडणार!

## प्रशासनाचे ग्रामस्थांना आश्वासन; शुक्रवारी होणारे रस्ता रोको आंदोलन तात्पुरते स्थगित

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

उन्हामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई आणि पशुपक्षी तसेच जनावरांना पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष असल्यामुळे कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडावे अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा कन्हेरवाडीचे माजी सरपंच राजेभाऊ फड यांनी केली होती. गुरुवारी प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गावाला भेट देऊन शुक्रवारी होणारे रस्ता रोको आंदोलन स्थगित करण्याची विनंती करून पाणी सोडण्याचे ठोस आश्वासन दिले. राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जवळ आलेली असून आंदोलनामुळे जयंतीच्या उत्साहात व्यत्यय येऊ नये यासाठी आम्ही हे आंदोलन स्थगित करत आहोत. येत्या २० एप्रिल पर्यंत पाणी सोडले नाही तर २२ एप्रिल रोजी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा राजेभाऊ फड यांनी दिला आहे.



याबाबत अधिक असे की, कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडावे अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती. पाणी न सोडल्यास दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार होते. आंदोलनाच्या पूर्वसंध्येला परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता लोंढे, तलाठी विष्णू गित्ते, परळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महझरअली तसेच प्रशासनातील अन्य अधिकाऱ्यांनी कन्हेरवाडी गावात जाऊन हनुमान मंदिर येथे बैठक घेऊन ग्रामस्थांशी चर्चा केली. १४ एप्रिल रोजी राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आहे. देशभरात याचा मोठा उत्साह असतो. आंदोलनामुळे कुठल्याही कार्यक्रमात व्यत्यय येणार नाही अशी भूमिका यावेळी घेण्यात आली. तसेच येत्या २० एप्रिल पर्यंत पाणी नदीपात्रात सोडण्याची कारवाई होईल असे आश्वासन तहसीलदार यांनी देऊन उद्याचे आंदोलन स्थगित करण्याची विनंती केल्यानंतर रास्ता रोको स्थगित करण्यात आला. प्रशासनाच्या विनंतीला मान देऊन आम्ही आंदोलन स्थगित केले आहे, मागे घेतलेले नाही.

२० एप्रिल पर्यंत पाणी नदीपात्रात सोडण्यात आले नाही तर येत्या २२ एप्रिल रोजी स्थगित केलेले आंदोलन करण्यात येईल असा इशारा माजी सरपंच राजेभाऊ फड यांनी दिला. यावेळी सेवा सहकारी सोसायटीचे व्हाइस चेअरमन मिनिनाथ दादा फड, माजी उपसरपंच रामहरी फड, पोलिस पाटील प्रल्हाद मुंडे, एच.यू.फड, बाबासाहेब फड, वसंत मुंडे, प्रशांत रोडे, मधुकर मुंडे टेलर, नवनाथ अप्पा फड, नाथराव फड, सुरेश घाडगे, महादेव मामा मुंडे, हरीकिशन बहिरे, संतोष मुंडे, वैजनाथ रोडे, ज्ञानेश्वर फड, समाधान मुंडे यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती.



# छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे कारंजे आणि रंगबिरंगी लाईट पूर्ववत सुरू करा

## एस.एम.युसूफ, रमेशराव गंगाधरे यांची बीड नगर परिषदेकडे मागणी

बीड । प्रतिनिधी

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या सुशोभीकरणासाठी लावलेले पाण्याचे कारंजे आणि रंगबिरंगी लाईट पूर्ववत सुरू करा अशी मागणी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी बीड नगर परिषदेकडे दिलेल्या निवेदनातून केली आहे. वरील विषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, संपूर्ण महाराष्ट्रात नसेल असा एकमेवाद्वितीय देखना आणि उच्च दर्जाच्या कलाकुसरीने तयार करण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हा बीड शहराचीच नाही तर जिल्ह्याची ओळख आहे. काही वर्षांपूर्वी बीड नगर परिषदेकडून याचे देखणे नूतनीकरण करण्यात आलेले आहे. यासाठी सढळ हस्ते लाखो रुपयांचा खर्च करण्यात आलेला आहे. तेव्हा सुशोभीकरणासाठी पुतळ्याच्या चोहोबाजूने पाण्याचे कारंजे लावण्यात आलेले आहे. उडणाऱ्या पाण्याच्या कारंज्यांसाठी रंगबिरंगी लाईट सुद्धा लावण्यात आलेले आहे. परंतु नव्या नवलाईचे नऊ दिवस म्हणतात तसे, ही यंत्रणा सुरू करून काही काळ बीड नगर परिषदेकडून चालविण्यात आली. मात्र जसे नेहमी म्हटले जाते की, शासन–प्रशासनाकडून करण्यात आलेले कोणतीही सुधारणात्मक कामे किंवा विकासात्मक कामे ही दीर्घकाळ न टिकता अल्पकाळातच त्याचे होत्याचे नव्हते होते.

याचाच प्रत्यय छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याबद्दल सुद्धा येतो आहे. येथील पाण्याचे कारंजे आणि रंगबिरंगी लाइट्स बंद पडलेले आहे. हे छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या महान व्यक्तिमत्वावर अन्याय करणारे आहे. तरी मुख्याधिकारी या नात्याने या बाबीकडे जातीने लक्ष देऊन येथील पाण्याचे कारंजे व रंगबिरंगी लाइट्स दररोज संध्याकाळी ०६:०० ते रात्री ११:०० वाजेपर्यंत सुरू ठेवावे. याची अंमलबजावणी त्वरित करावी अन्यथा छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोर आंदोलन करण्यात येईल. असा इशारा एस.एम.युसूफ आणि रमेशराव गंगाधरे यांनी निवेदनातून दिला आहे.

# बीड लोकसभा मतदारसंघात आरोग्य सेवा इमारती बांधकामासाठी २२.४० कोटी निधी मंजूर : खा.सोनवणे



बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदार संघातील नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा मिळावी यासाठी प्राथमिक आरोग्य उप केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच हेल्थ युनिट च्या स्वतंत्र व मजबूत इमारती असण्याची गरज लक्षात घेऊन केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत १५ व्या वित्त आयोगातून बीड जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांच्या बळकटी करणासाठी २२ कोटी ४० लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी पाठ पुरावा केला आहे. या निधीमुळे ग्रामीण व शहरीभागातील आरोग्य सेवा सुधारण्यास मोठा हातभार लागणार आहे. बीड जिल्ह्यातील सर्वच विधानसभा मतदार संघातील आरोग्य केंद्र, उपकेंद्र इमारतींसाठी हा निधी वितरित करण्यात आला आहे.

केज विधानसभा संघात २ कोटी ८३ लाख, बीड विधानसभा मतदार संघात २ कोटी ९१ लाख, माजलगाव विधानसभा मतदार संघात २ कोटी ३३ लाख, आष्टी विधानसभा मतदारसंघात १० कोटी ८२ लाख, परळी विधानसभा मतदार संघात १ कोटी १७ लाख तर गेवराई विधानसभा मतदारसंघात २ कोटी ३३ लाख रूपये मंजूर करण्यात आले आहेत. या निधीमधून प्रस्तावित करण्यात आलेली कामे विहित वेळेच्या आत व निश्चित करण्यात आलेल्या दर्जानुसार पूर्ण होतील अशी माहिती खा.बजरंग सोनवणे यांनी दिली. या निधीतून निर्माण होणाऱ्या सुविधांमुळे ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम होणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांना चांगल्या आरोग्यसुविधा मिळाव्यात, यासाठी खा. बजरंग सोनवणे यांनी लोकसभा निवडणूकीनंतर जिल्ह्यातील रूग्णालयाचा आढावा घेतला होता. शिवाय आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला अचानक भेट देवून त्या ठिकाणी रूग्णालय इमारतीचा प्रश्न लक्षात घेत जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारतींचा प्रश्न मार्गी लावण्यासंदर्भात पाठ पुरावा सुरू केला होता. या पाठपुराव्याला यश आले असून आता जिल्ह्यातील गरज असलेल्या ३३ आरोग्य उपकेंद्रांना इमारती मिळणार आहेत.

# नेकनूर येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र मंजूर

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांचे आभार : सुजीत शिंदे

नेकनूर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नेकनूर येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र मंजुर झाल्याची माहिती युवासेना जिल्हाप्रमुख सुजीत शिंदे यांनी दिली आहे. त्यामुळे नेकनूरसह पंचक्रोशीतील नागरिकांच्या आरोग्य समस्येची चिंता मिटणार आहे. हे आरोग्य केंद्र मंजूर करण्यासाठी युवासेना जिल्हाप्रमुख सुजीत शिंदे यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळुक यांच्या मार्गदर्शनाखाली मंत्रालय स्तरावर वारंवार पाठपुरावा केला. या पाठपुराव्याचे फलित सकारात्मक स्वरूपात समोर आले असून नेकनूर येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र मंजूर करण्यात आले आहे.



नेकनूर सह पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या मागणीनुसार युवासेना जिल्हाप्रमुख सुजीत शिंदे यांनी प्राथमिक आरोग्य उपकेंद्र मंजूर करण्यासाठी आरोग्य विभाग व संबंधित अधिकारी तसेच आरोग्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करून आरोग्य उपकेंद्र मंजूर केले आहे. नेकनूर येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रामुळे स्थानिक ग्रामस्थांना उद्भवणाऱ्या आजारांवर नियंत्रण मिळवणे, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे, महत्त्वपूर्ण आकडेवारी गोळा करणे, रेफरल व प्रयोगशाळेच्या सेवा पुरविणे तर जीवघेण्या आजारांपासून नागरिकांचा बचाव होण्यासाठी उपकेंद्राचा रुग्णांना लाभ होणार आहे. नेकनूर येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र मंजूर केल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे व आरोग्यमंत्री प्रकाशजी आबीटकर यांचे युवासेना जिल्हाप्रमुख सुजीत शिंदे यांनी आभार मानले.

### गटशिक्षण अधिकारी साहेब मागितलेली माहिती वेळेत द्या; उपोषणाची वेळ येऊ देऊ नका : संदीप पांचाळ

# धारूरच्या शिक्षण विभागातील भ्रष्टाचार उघड होणार

धारूर । प्रतिनिधी

येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालय हे सतत चर्चेत असते त्यात त्यात मोठा भ्रष्टाचार झालेला दिसून येत आहे व मागितलेली माहिती सुद्धा वेळेवर देत नाहीत व कार्यालयीन वेळेत सुद्धा गटशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी हे कार्यालयात सापडत नाहीत त्यामुळे आवरगाव येथील संदीप अनंतराव पांचाळ यांनी गेल्या दोन महिन्या पूर्वी समग्र शिक्षा अभियान व अन्य २०११ पासून ते आज पर्यंत माहिती मिळवण्यासाठी गटविकास अधिकारी पंचायत समिती धारूर यांना माहिती च्या मागणीसाठी रीतसर अर्ज देण्यात आला होते परंतु गटशिक्षणाधिकाऱ्यात





चाललेला सावळा गोंधळ व होत असलेला भ्रष्टाचार उघड येईल यामुळे गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख हे माहिती देण्यास टाळाटाळ करत असल्याने ती माहिती आज दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन सुद्धात्यांनी आजपर्यंत ही माहिती देण्यात आलेली नाही.

त्यामुळे गट विकास अधिकारी पंचायत समिती धारूर यांच्याकडे संदीप पांचाळ यांनी प्रथम आपील केल्याने त्यांनी दि.२० मार्च रोजी प्रथम सुनावणी सुधा पंचायत समिती धारूर येथे ठेवण्यात आली होती परंतु या सुनावणीसाठी माहितीचे प्रतिनिधी म्हणून आय इ साधन व्यक्ती श्री मदने डी एन हे उपस्थित होते व अपिलार्थी या सुनावणीच्या वेळी उपस्थित होते, यात गटविकास अधिकारी पंचायत समिती धारूर यांनी गटशिक्षणाधिकारी धारूर यांना आठ दिवसात माहिती देण्यात यावी असे सुनावले आहे होते परंतु तोही कालावधी निघून गेले गेला असल्याने अपिलार्थी यांनी छत्रपती संभाजीनगर येथे अपील केले आहे परंतु ही अपील करण्याची वेळ सुद्धा गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने येऊ द्यायला नको होती त्यामुळे शिक्षण प्रेमी मध्ये नाराजगी व्यक्त होत आहे व गटशिक्षणाधिकाऱ्याला चाललेला भ्रष्टाचार हा सर्व जनतेस माहीत होत आहे त्यामुळे आपली संदीप अनंतराव पांचाळ हे आठ दिवसाच्या जर का त्यांनी माहिती दिली नाही तर गटशिक्षणाधिकार्यालय कार्यालयात रीतसर सर्व कार्यालयात निवेदन देऊन आमरण उपोषणास बसणार आहेत असे या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

### केतुरा गावचे विद्यमान सरपंच परमेश्वर नाना तळेकर यांना राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार जाहीर, व सरपंच सेवा संघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निवड

# सिनेअभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते होणार तळेकर यांचा गौरव

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सर्व सरपंच्यांच्या नावा मध्ये सर्वात चर्चेत असणारे नाव म्हणजे बीड तालुक्यातील केतुरा गावचे लोकनियुक्त सरपंच परमेश्वर नाना तळेकर नुकताच त्यांना सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती देण्यात आली ,२ वर्ष ३ महिन्या पुर्वी तळेकर यांनी ग्रामपंचायतचा पदभार स्वीकारला साधे ग्रामपंचायत भवन आणि स्मशान भूमी नसलेल्या गावचा विकास करण्या साठी त्यांनी निस्वार्थी पणे काम सुरू केले, युवकांना व्यसना पासुन दुर करण्यासाठी केतुरा गावच्या इतिहासातील पहिली व्यसन मुक्त मोहिम राबवली. गावचा पाणी प्रश्न दुर करण्यासाठी नदी खोलिकरण केले, गावात झाडे वाटप असो की प्रत्येक ५/६ महिन्यानंतर आरोग्य शिबीर आयोजन असो, गावातल्या जिल्हा परिषद शाळेची सुधारणा गावातील विद्यार्थ्यांना मोफत अभ्यासिका सुरू करणे, प्रत्येक गावातील नागरीकांचे वैयक्तिक लाभाचे कामे लक्ष पुर्वक करणे या सर्व गोष्टींमुळे ते नेहमी चर्चेत असतात, गावातील सिमेंट रस्ते, प्युअर ब्लॉक बसवणे, पथदिवे असे कामे अगदी चोखपणे पुर्ण झाले आहेत, नवनिर्वाचीत ग्रामपंचायत भवनचे काम ही अंतीम टप्प्यात आहे, गावातील युवकांची ओढ शिक्षणांकडे आणि वैयक्तिक सुधारणे कडे असावी, यासाठी नानांची नेहमी त्यांना प्रोत्सहानाची थाप असते.

बीड तालुक्यातील केतुरा गावातील विद्यमान सरपंच परमेश्वर नाना तळेकर यांना सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य आयोजित राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे, परमेश्वर तळेकर गेल्या अनेक वर्षापासून बीड जिल्ह्याच्या सामाजिक राजकीय शिक्षण क्षेत्रात अग्रेसर आहेत, वारकरी संप्रदायामध्ये पाईक अशी त्यांची एक आगळी ओळख बीड जिल्ह्यामध्ये आहे, तळेकर यांच्या सामाजिक शैक्षणिक कार्याची दखल घेऊन सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य च्या कमिटीने त्यांना पुरस्कार जाहीर केला आहे, व त्याबरोबर



त्यांना सरपंच सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष पद सुद्धा देण्यात आलेले आहे, सरपंच सेवा संघटनेचे मार्गदर्शक यादवराव पावसे, बाबासाहेब पावसे, सरपंच संघटित चळवळीतील नेते, रोहित पवार प्रदेशाध्यक्ष सरपंच सेवा संघ, अमोल शेवाळे संपर्कप्रमुख, केतुरा येथील ग्रामपंचायत सदस्य ,वंसत सिरसट, उपसरपंच संगीता मच्छिंद्र गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य मधुमती कचरू गिरी, सुदर्शन घाडगे, सोसायटी चेअरमन रामनाथ रहाडे ,उप चेअरमन बाबासाहेब शिरसाठ व मौजे केतुरा येथील येथील अनेक जेष्ठ लोकांच्या सहभागातून हे साध्य झाले असल्याचे प्रतिपादन केतुरा गावचे विद्यमान सरपंच परमेश्वर नाना तळेकर यांनी केले आहे.

पुरस्कार वितरण सोहळा १३. एप्रिल, २०२५, रोजी सकाळी ११ वाजता स्थळ माऊली संकुल सभागृह सावेडी रोड अहिल्यानगर, या ठिकाणी होणार आहे, तळेकर यांना समाज भूषण पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांना महाराष्ट्र राज्यातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT